REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 1 | OCTOBER - 2024

# शेतीचे व्यापारीकरण (काल व आज)

डॉ. अरुणा रविंद्र वाघोले
इतिहास विभाग प्रमुख, सहयोगी प्राध्यापक,
मा.बाळासाहेब जाधव.कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आळे.ता.जुन्नर जि.पुणे.



भारत हा कृषिप्रधान देश आहे शेतावर काम करणारा शेतकरी, कुळ, मजूर, व्यापारी यांच्या कार्याचा भाग जसा महत्त्वाचा आहे, तसाच आपण शेती करतो, शेतकरी कर्जातच जन्मतो व कर्जातच मरतो म्हणून भावी पिढी सुखी व्हावी म्हणून तो खूप कष्ट करतो. व मुलांना मुलींना शिकवतो. त्याने लहानपणापासून महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांचे शोषण, यांचे वास्तव चित्र, गुलामगिरी, शेतकऱ्याचा आसूड या दोन ग्रंथात मांडले, हे शेतकर्यांना माहिती आहे तरीही सरकारला अनेक मागण्या केल्या होत्या. की जेणेकरून शेतकऱ्यांचे शोषण थांबून तो ज्ञानी बनावा, तो आपल्या हक्कांसाठी जागृत व्हावा व त्याचे राज्य (बळीचे राज्य) भारतात यावे हे ज्योतिबांचे स्वप्न होते. शतकानुशतके अस्पृश्य समाजावर जो अन्याय होत होता त्या विरुद्ध महाराष्ट्रात पहिला जबर आघात महात्मा फुले यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना तर आपला गुरुस्थानी मानले आहे. भगवान बुद्ध, संत कबीर यांच्याप्रमाणे माझे तिसरे गुरु महात्मा ज्योतिराव फुले हे होते. महात्मा फुले यांच्याच सामाजिक समतेचा लढा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविला असे डॉ. भालचंद्र फडके म्हणतात. फुले -आंबेडकर हा एका अर्थाने नवा द्वंद्व समास आहे.

आज खऱ्या अर्थाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आपल्या ध्येयांचा विकास करताना कोणत्या व कशा अडचणी येतात?, येत होत्या? यासाठी मुला-मुलींनी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ब्रिटिशांचे शेतीविषयक धोरण, अन्याय, अडचणी हे सखोल समजून घेणे गरजेचे आहे. ध्येय विकसित करण्यासाठी शेतकरी सुखी, समाधानी व बळीचे राज्य येण्यासाठी समता, न्याय, हक्क व अधिकार मिळाले पाहिजेत. समान न्याय सर्वांसाठी हवा. तेव्हा शैक्षणिक विकास ध्येयपूर्तता करण्यासाठी खरी जागृती या धोरणामुळे होणार आहे.

## प्रास्ताविक

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० भारतीय राज्यघटनेचे अमृत महोत्सवी वर्ष या महत्त्वाच्या शुभप्रसंगी हे धोरण राबविताना विविध पैलू, ध्येय, दृष्टिकोन राबवणार आहोत. पण आपण शेतीप्रधान देशाचे नागरिक आहोत. ही शेती, शेती व्यवसाय, व्यापारीकरण यावर सखोल अभ्यास व्हावा. "शेतकरी राजा सुखी व्हावा" त्यानुसार NEP मध्ये शेतकरी वर्गातील मुलांचा विकास होणे, सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शेतकरी, शेती व्यवस्था यांचा आज सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. NEP धोरणात शेतकरी हा घटक महत्त्वाचा आहे.

आज आपण ज्या काळात जीवन जगत आहोत, त्या देशाचा अमृत महोत्सव साजरा झाला आणि आता भारतीय राज्यघटनेचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत. यातील घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका पाहता अष्टावधानी, अष्टलक्षी व अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची होती. १) जन्म २) शिक्षण ३) अस्पृश्यता ४) जातीयता ५) सत्याग्रह ६) शेतकरी परिषदा ७) वृत्तपत्र जागृती ८) स्वतंत्र मतदार संघाची मागणी ९) संघटन कौशल्य १०) भारतीय राज्यघटना इ. अठरोप्रहर सतत जागृतीचा ध्यास घेणारे भारतीय नेते ब्रिटिशांच्या राजवटीत ग्रामीण अर्थव्यवस्था व ग्रामीण समाज व्यवस्था यात मोठे बदल झाले. ब्रिटिशपूर्व काळात ग्राम व्यवस्था ही स्वयंपूर्ण

होती. चान्स मरेकस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खेड्याबाबत "भारतीय खेडी म्हणजे जणू छोटी स्वायत्त गणराज्येच होती. राजघराणे बदलत गेली, क्रांतीचे चक्र बदलत गेले. हिंदू, पठाण, मुघल, मराठे, शीख, इंग्रज असे सत्ताधारी बदलत गेले, पण भारतीय खेडी मात्र जशीच्या तशी राहिली हेच मत होते" ब्रिटिशपूर्व काळातील आक्रमक व ब्रिटिश आक्रमक यांच्यात मात्र एक फरक होता. ब्रिटिशपूर्व आक्रमकांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर आघात केला नाही, पण ब्रिटिश काळात मात्र भारतीय अर्थव्यवस्था व ग्रामीण कृषी, सामाजिक रचनेत अमुलाग्र बदल झाला. स्वयंपूर्ण ग्राम व्यवस्था हा मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्थेचे मूलभूत वैशिष्टय होत पण ब्रिटिश राजवटीत त्यात बदल झाला.

**ब्रिटिश आर्थिक धोरणामुळे ग्रामीण कृषी सामाजिक रचनेत अमुलाग्र बदल झाले. ग्रामीण कृषी सामाजिक अर्थव्यवस्थेतील पुढील वर्ग-**

1) जमीनदार २) सावकार ३) शेतकरी ४) आलूतेदार ५) शेतमजूर ६) बलुतेदार ७) कारागीर ८) छोटे व्यापारी (किरकोळ विक्रेते) ९) मजूर १०) मध्यमवर्ग

ब्रिटिश भारतात येण्यापूर्वीपासून काही संपन्न शहरातून हस्तोद्योग व कुटीरउद्योग चालत असे. उदा. रेशीम, लोकरी व सुती कापड, खनिज तेल, धातूंची भांडी, शस्त्रास्त्रे, मौल्यवान दागिने, संगमरवरी दगडावर काम, चंदनावरील कोरीव काम, चामड्याच्या वस्तू, सुगंधी द्रव्य, जहाज बांधणी इ. उद्योग परंपरेने शतकानुशतके चालू होते. विशेषतः रेशीम, लोकर व सुती कपड्यांच्या उत्पादनात कारागिरांचा वर्ग मोठ्या प्रमाणात होता. परंतु ब्रिटिशांनी ब्रिटनमधील उद्योगांना संरक्षण देण्यासाठी संरक्षक जकातीचे धोरण राबविले. इ.स. १७०० व १७२० साली ब्रिटिश पार्लमेंटने कायदे करून भारतातील सुती व रेशीम कापडावर निर्बंध घातल्याने लोकरी व सुती रेशमी कापड आता इंग्लंडमध्ये विकेनासे झाले. उदा. डाक्काहून इंग्लंडमध्ये जाणाऱ्या मालावर १७५७ साली ७५ टक्के जकात होती, १७८७ मध्ये ३० लक्ष रुपये किमतीची मलमल इंग्लंडला निर्यात झाली होती. इ.स. १८१७ साली तर डाक्काहून इंग्लंडला निर्यात होणारी मलमल निर्यात होणे पूर्णपणे बंद थांबले होते. जे डाक्का शहर "भारतीय मँचेस्टर" म्हणून १७५७ साली ओळखले जात होते, तेच डाक्का शहर १८४० मध्ये लोकसंख्या वाढून व आर्थिक उलाढाल कमी होऊन एक छोटे दरिद्री गाव झाले होते.

ब्रिटिशांच्या धोरणामुळे मुर्शिदाबाद, सुरत वगैरे शहरे उजाड झाली. तेथील कारागिरांनी खेड्यात जाणे पसंत केले. डाक्का शहराची लोकसंख्या १८२४ मध्ये दीड लक्ष होती तर १८३७ मध्ये घटून २०००० राहिली. या कामगार कारागिरांचा वर्ग विविध कारणांमुळे बेकार झाला. ती कारणे खालील प्रमाणे-

1) विविध प्रकारच्या कापडाच्या निर्यातीवर ब्रिटिश पार्लमेंटने निर्बंध घातल्याने कापड उद्योगातील कारागीर बेकार झाले.
2) भारतातील हस्तोद्योग इंग्लंड मधील यंत्रावर तयार यंत्रोत्पादित होणाऱ्या स्वस्त मालाची स्पर्धा करणे शक्यच नव्हते.
3) ब्रिटिश विविध व्यवसायिकांना लागणारा कच्चामाल मोठ्या प्रमाणात निर्यात केल्याने हस्तोद्योग बंद पडले.
4) ब्रिटिशपूर्व काळात अनेक छोटे-मोठे राजे, रजवाडे, सरदार कारागिरांना आपल्या दरबारी आश्रय देत असत, पण त्यांची राज्येच ब्रिटिशांनी जिंकल्याने त्यांना आता उपजीविकेसाठी शेतीकडे जावे लागले.

**कृषी सामाजिक व्यवस्था-**

1) **जमीनदार-**

ब्रिटिशपूर्व काळात जमीनदारांचा वर्गच नव्हता. गावची जमीन ही त्या संपूर्ण गावची असे. राजाही जमिनीचा मालक नव्हता. त्यांनी नेमलेले जमीनदार, वतनदारही जमिनीचे मालक नव्हते. जमीन ही शेतकऱ्यांना कसायला दिलेली असे. गावच्या धान्य उत्पादनाचा काही भाग महसुलाच्या रूपाने सरकारला मिळत असे. गावातील भांडण- तंटे वगैरे पंचायत निकालात काढी. लॉर्ड कॉर्नवॉलिसने कायमधारा ठरवून देण्याची पद्धत सुरू करून जमीनदारांचा वर्ग निर्माण झाला. हे जमीनदार ब्रिटिशांशी एकनिष्ठ होते. सरकार व रयत यांच्यातील मध्यस्थी होते. जमीनधारा पद्धतीमुळे ब्रिटिशांना निश्चितपणे कायमस्वरूपी महसूल मिळण्याची सोय झाली. जमीनदार सारा वसुलीचे काम करत. लॉर्ड कॉर्नवॉलिसची ही कायमधारा महसूल पद्धत प्रामुख्याने बंगाल, बिहार,ओरिसा या प्रदेशात रूढ झाली. याच पद्धतीमुळे ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ असा जमीनदारांचा वर्ग अस्तित्वात आला. जमीनदार स्वतः शेती करत नसत. शेतीमध्ये जमीनदारांना आवडही नव्हती.

### 2) शेतकरी व कुळे-

ब्रिटिश राजवटीत जमीन कसणारे शेतकरी आता कुळे झाली. जमीनदार कुळांकडून सारा वसूल करत. त्यासाठी त्यांचा छळही होई. बटाईदार शेतकरी जमीनदारांकडून वार्षिक करार तत्वावर कसण्यासाठी जमीन घेत व जमीनदारास एक विशेष खंडणी (लगान) देत. सरकारचा महसूलही द्यावा लागे. उदा. एकट्या बंगाल प्रांतात वसूल केलेला महसूल-

| इ.स. | पौंड महसूल |
|---|---|
| 1) १७६४-६५ | ८,७७,००० पौंड |
| 2) १७७१-७२ | २३,४१,००० पौंड |
| 3) १७९३-९४ | ३,४०,००,००० पौंड |

रॉबर्ट क्लाइव्ह पासून वॉरन हेस्टिंगच्या काळापर्यंत बंगालच्या गव्हर्नरने बंगाल मधून प्रचंड महसूल वसूल केला. इ.स. १७७० साली बंगाल प्रांतात भयंकर दुष्काळ पडला, तरीही महसुलाच्या वसुलीत मात्र वाढ झाली होती.

कुळांना जमिनीच्या मशागतीचे कामे करावी लागत, पण त्याचबरोबर जमीनदारांच्या घरचीही काम करावी लागत. कुळे एक प्रकारे जमीनदारांचे वेठबिगारच झाली. इ.स. १८५९ पासून १९४० पर्यंत जमीन मालकांना कुळांवर जुलूम करता येऊ नये, म्हणून कित्येक कायदे पास झाले. पण त्या कायद्यांचा कुळांना काही फायदा होऊ नये म्हणून कित्येक पळवाटा काढला गेल्या. कुळांचा कायदा पहिलाच नाही.

### शेतमजूर-

१८२१ ते १८३१ या काळातील भारताच्या कृषी व्यवसायातील लोक-

| अ. क्र | वर्ष | जमीनदार | शेतकरी व (जमीनमालक) | शेतमजुर |
|---|---|---|---|---|
| १ | १९२१ | ३७ लक्ष | ७ कोटी ४६ लक्ष | २ कोटी १७ लक्ष |
| २ | १९३१ | ४१ लक्ष | ६ कोटी ५५ लक्ष | ३ कोटी ३५ लक्ष |

संदर्भ- A.R. Desai- Social Background of Indian Nationalism

वरील ए. आर. देसाईच्या आकडेवारीनुसार /आधारे भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसते. सरकारने जमिनीच्या वसुलीकडे लक्ष दिले. जमीनदारांनी सिंचनव्यवस्था, खत, उत्कृष्ट बियाणे, अवजारे याकडे दुर्लक्ष केले. याचा परिणाम शेतकरी आणखीन गरीबच राहिले. परिणामी भूमिहीन शेतमजुरांची संख्याही वाढली. चहा, कॉफी, नीळ, रबर यांच्या मळ्यात काम करणारा मजुरांचा वर्गही ग्रामीण कृषी समाज रचनेतील एक घटकच होता. १९२२ साली लॉर्ड चेम्सफोर्ड यांनी भारतात दोन कोटी मजूर आहेत असे घोषित केले. पण फॅक्टरी ॲक्टच्या कक्षात येणार्या मजुरांची संख्या फक्त १३ लक्ष होती. बाकी मजूर विविध छोट्या व्यावसायात, शेतीत, चहा व नीळच्या मळ्यातच काम करीत.

### मध्यमवर्ग-

ब्रिटिश राजवटीत सरकारी अधिकारी व कर्मचारी, वकील, डॉक्टर, शिक्षक, लेखक, पत्रकार, विद्वान, छोटे व्यापारी इत्यादी मध्यमवर्गही उदयास आला होता. या वर्गाचे वास्तव्य मोठ्या शहरातून असले तरी, त्यापैकी काहींचा ग्रामीण जीवनाशी संपर्क येत असे. इंग्रज शासनाच्या न्यायप्रियतेवर या वर्गाचा विश्वास होता. या वर्गाची आर्थिक व सामाजिक स्थिती ही बऱ्यापैकी होती. पण या मध्यमवर्गास ग्रामीण कृषी सामाजिक रचनेत विशेषतः स्थान नव्हते.

### व्यापारी-

ग्रामीण कृषी व्यवस्थेत सामाजिक रचनेत व्यापाऱ्यांनाही महत्त्व आले होते. कारण रेल्वेमार्गाजवळील खेड्यांमधून नगदी पिकांचे उत्पादन होऊ लागल्यावर माल गोळा करणे, त्याची प्रतवारी ठरवणे, त्याच्या साठा करणे व तो शहरात नेऊन विकणे ही कामे करणारा एक

व्यापारी वर्गही समाजात अस्तित्वात आला. काही व्यापारी सावकारही होते. इ.स. १८२३ पासून जेव्हा मुक्त व्यापारास सुरुवात झाली, तेव्हा हा वर्ग अधिक मोठ्या संखेने समाज व्यवस्थेत दिसू लागला.

### अलुतेदार – बलुतेदार-

हे तर ग्रामीण सामाजिक रचनेतील घटकच होते. त्यांना कामाचा मोबदला धान्याच्या स्वरूपात मिळत होता. लोहार, सुतार, महार, महार, कुंभार, चांभार, परीट, न्हावी, भट, गुरव, मुलानी, कोळी हे बारा बलुतेदार होते. तर तेली, तांबोळी, साळी, संगम,बळवंत, दवंड्या, ठाकूर, घडशी, तराठ, सोनार व चौगुला, माळी हे बारा अलुतेदार होते.

### शेतीचे व्यापारीकरण-

शेतीचे व्यापारीकरण म्हणजे काय? कौटुंबिक वा स्थानिक वापरा पुरते नव्हे तर बाजारपेठेत शेतमाल विकून नफा मिळवण्यासाठी म्हणजेच व्यापार उद्दिष्ट समोर ठेवून उत्पादन करणे यास शेतीचे व्यापारीकरण म्हणतात. यातील हेतू भांडवलशाही हेतूने नगदी पिके काढण्यावर भर असतो. नगदी पिकांना(Cash Crops) बाजारपेठेत मोठी मागणी असल्यामुळे अशा पिकांच्या विक्रीतून रोख पैसा प्राप्त होतो.

ब्रिटिश राजवटीत चहा, कॉफी, साखर, गहू, तांदूळ, कापूस, ताग, नीळ, तंबाखू, अफू, मसाल्याचे पदार्थ या पिकांचे उत्पादन व्यापारी तत्त्वावर मोठ्या प्रमाणात घेण्यास प्रारंभ झाला. म्हणजेच शेतीचे व्यापारीकरण झाले.

### भारतात शेतीचे व्यापारीकरण का घडून आले ? कारणे-

1) शेतकऱ्यांना रोख पैशाची आवश्यकता जमीन महसूल रोख व वेळेवर भरणा करणे, सावकारांचे व्याज देण्यासाठी, कर्जफेडीसाठी पैसा आवश्यक होता.
2) जत्रेच्या वेळी गरजेच्या वस्तू, माल बाजारपेठेतून खरेदीसाठी रोख पैसा हवा होता.
3) ब्रिटिशांच्या भौतिक सुधारणांमुळे रेल्वे, रस्ते, मोटरगाडया याद्वारे कमीत कमी वेळात शेतमाल कमी वाहतूक खर्चात दूरच्या ठिकाणी विकणे व रोख पैसा मिळविणे शक्य झाले, यामुळे खेड्यातील माल बाहेर जाऊ लागला व बाहेरचा माल खेड्यात आला.
4) भारतातील शेतकरी कापूस, चहा, कॉफी, साखर, तंबाखू, नीळ, ताग इ. उत्पादन करत असे त्यांना परदेशी बाजारपेठेत मागणीही होती म्हणून ही पिके घेत असे.
5) प्रामुख्याने भारतीय शेतीचे व्यापारीकरण करण्यात ब्रिटिशांचे व्यापारी व औद्योगिक हितसंबंधही होते.
6) भूमध्य समुद्र, तांबडा समुद्र यांना जोडणारा सुएझ कालवा फर्डिनंड डी लेसेप्स या फ्रेंच तंत्रज्ञानाने पूर्ण केला. यामुळे सागरी प्रवाहाचे अंतर ३००० मैल कमी झाले, त्यामुळे कच्चामाल व पक्का माल यातील आयात निर्यातीचे प्रमाण वाढले.
7) बाष्प शक्तीवर चालणाऱ्या जहाजाचा खर्च व वेळ कमी झाला, मालवाहतुकीचा खर्च कमी झाला या बदलांमुळे व्यापारी उलाढालींना वेग आला.
8) अमेरिकेतील इ.स. १८६०-६५ काळातील यादवी युद्धांमुळे कापूस उत्पादनावर अत्यंत वाईट परिणाम झाला. अमेरिकेची कापसाची निर्यात इंग्लंडला कमी झाली, यामुळे भारतीय कापसाला असणारी मागणी ६ ते ७ पट वाढली व भारतीयांना किंमत अधिक मिळाली.
9) हवामानानुसार, अनुकूलतेनुसार विशिष्ट प्रदेशात विशिष्ट पिके घेणे महत्त्वाचे हे शेतकर्यांच्या लक्षात आल्याने शेतीच्या व्यापारीकरणास गती आली, मुळात शेतीचे व्यापारीकरण ही भारतातील शेतकऱ्यांवर लादलेली प्रतिक्रिया होती. याचे बरे वाईट परिणाम झाले आहेत.

### परिणाम-

1) भारतीय शेतीचे व्यापारीकरणामुळे भारतातील शेतकऱ्यांना फारसा फायदा झाला नाही.
2) युरोपीय मळे वाल्यांनी चहा व नीळ या उद्योगात भांडवल गुंतवले निर्यात केली व पैसा कमावला.
3) मळ्यात काम करणाऱ्या भारतीय शेतमजुरास कमी वेतन / मजुरी देत होते.
4) भारतीय जमीनदार, सावकार व दलाल यांना व्यापारीकरणाचा फायदा झाला.

5) पश्चिम भारतातील शेतकऱ्यांवर कापूस पिकविण्याची सक्ती केली जात केली त्याचा फायदा सावकार जमीनदार व दलांना विशेष फायदा झाला.
6) शेतकऱ्यांना काढणीनंतर पीक येताच ते बाजारात विकावे लागे, त्यास कमी किंमत येई. पुन्हा ५-६ महिन्यानंतर जवळचे धान्य संपले की, परत धान्य विकत घ्यावे लागेल तेव्हा मात्र धान्याची किंमत वाढलेली असे.
7) दलालांना फायदा झाला- बाजारपेठेतील चढ-उतारांचा अभ्यास असे व त्यांच्याकडे पैसाही असे. त्यामुळे दलाल श्रीमंत झाले. त्यांनी जमिनी खरेदी केल्या परिणामी उपर्या , प्रत्यक्ष शेतात कष्ट न करणाऱ्यांची संख्या वाढली. गैरहजर जमीदारांचे प्रमाण वाढले.
8) प्रामुख्याने व्यापारीकरणामुळे, नगदी पिकांमुळे तांदूळ, ज्वारी, बाजरी व कडधान्याच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष झाले. पिकांच्या किमती वाढल्या, धान्याची टंचाई निर्माण झाली, गरिबांचे हाल वाढले, शेतकऱ्यांची स्थलांतर सुरू झाले.
9) बिहार, आसाम, उत्तर प्रदेशातील मजुरांचे स्थलांतर सुरू झाले होते. मजूर पुरवठा करून नफा कमावण्याकडे दलालांचा वर्ग पुढे झाला.
10) राष्ट्रीय संदर्भात विचार करता शेतीच्या व्यापारीकरणामुळे गावच्या बंदिस्त कोंबातून बाहेर पडून गावातील शेतकरी आता मोठ्या विश्वाला (संपूर्ण भारत संपूर्ण व युरोप) जोडला गेला.
11) राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभारच लावला.
12) सरंजामशाही उत्पादन पद्धतीची जागा आधुनिक भांडवलशाही उत्पादन पद्धतीने घेतली.

खरे शेतकरी, शेतमजूर व भारतीय अर्थव्यवस्था यांच्यावर दूरगामी परिणाम झाले. १९ वे शतक ते २१ व्या शतकातील या परिस्थितीत कधीही बदल झाला नाही. शतकामागून शतके गेली. गरीब शेतकरी गरीबच राहिला. यातून बाहेर पडण्यासाठी NEP धोरणातील बदल आवश्यक आहे.

## निष्कर्ष-

भारतीय राज्यघटनेने सर्वांना समानतेने जीवन जगण्याचा हक्क व अधिकार दिलेला आहे. भारतीय शेतकरी हा सुखी झाला, तर बळीचे राज्य येईल. NEP धोरणांचा विकास, ध्येय साध्य करण्यासाठी समाजातील, राजकारणातील सर्व घटकांचा विचार करून शेतकरी त्यांचे व्यापारीकरण, आत्महत्या, मालाला हमीभाव मिळावा, तो सुखी व्हावा हा हेतू साध्य करणे असा आहे. पूर्वी ते आज ज्यांनी धडपड केली त्यांचा सखोल सखोल अभ्यास व्हावा.

## संदर्भग्रंथ व तळटीपा-

1) भारताचा इतिहास व संस्कृती (इ.स. १७६२ ते १९५०) ले. डॉ. एस. एस. गाठाळ, प्रकाशन कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद. प्रथमावृत्ती जुलै २००८. पृ. १०९
2) अर्थचिंतन: १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील आर्थिक विचार : ले. डॉ. उत्तम पठारे. प्रकाशक- सनय प्रकाशन. नारायणगाव, ता- जुन्नर, जि. पुणे. प्रथमावृत्ती १८ नोव्हें. २०२१. पृ. १२८
3) ज्ञान-अभिषेक : ले.अरुणा रविंद्र वाघोले, प्रकाशक- हर्षवर्धन प्रकाशन, बीड. प्रथमावृत्ती डिसेंबर २०१९ पृ. १०७.
4) ज्ञान अभिषेक : ले. अरुणा रविंद्र वाघोले. कित्ता पृ. १०७
5) मॉडर्न इंडिया, आधुनिक भारत : मूळ लेखक बिपनचंद्र मराठी, नुवाद डॉ. एम. व्ही. काळे. प्रकाशक- के. सागर पब्लिकेशन्स, पुणे. द्वितीय आवृत्ती ०१/१०/२००८. पृ. ४४, ४५
6) मॉडर्न इंडिया, आधुनिक भारत : कित्ता पृ. ४६
7) मॉडर्न इंडिया, आधुनिक भारत : कित्ता पृ. ४६
8) भारताचा इतिहास व संस्कृती कित्ता पृ. ११२